FORM-1A N.C.R.B. I.I.F.-I

(1)

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT 0154175

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ऑ.सी.बी पहिली खबर क्र. FIR No. 9६, वर्ष Year २०२१, दिनांक Date १८/०३/२१

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधि. १९८८, कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act –, कलमे Sections –
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections –

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day ……, तारीख पासून Date from ०५/०३/२१ वेळ Time ते, तारीख पर्यंत Date to १०/०३/२१ वेळ Time ……

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खुण करा) (Tick applicable portion).

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date ०८/०३/२०२१, वेळ Time ……

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. २५/२०२१, तारीख Date १८/०३/२१ वेळ Time १३:३० वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यांपासून अंतर व दिशा Direction and distance from P. S. ……, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. ……

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name उपनिबंधक कार्यालय, सहकारी संस्था, पी-विभाग, ठाकुर कॉम्प्लेक्स, कांदिवली (पूर्व), मुंबई - १०१. ठिकाणाचे नंबर No. if any ……, गल्ली Ward ……, रस्त्याचे नाव Name of road ……

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ……, गाव Village ……, पोस्ट Post ……, तालुका Taluka ……, जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र.

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ……, तालुका Taluka ……, जिल्हा Dist. ……, राज्य State ……

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name श्री. एलीहा पाल पंजा (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name श्री. मृत्युंजय पंजा

   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ३५ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ८८३०००४२२०

   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ……, दिल्याचा दिनांक Date of Issue ……, दिल्याचे ठिकाण Place of Issue …… (f) व्यवसाय Occupation ……

   (g) धर्म Religion ख्रिश्चन, जात Caste ……, जनजात Sub-Caste ……

   (h) पत्ता Address फ्लॅट नं. सी/४१२, ४ था मजला, मालाड समिर को. ऑप. हौ. सोसा. लि., समिर बिल्डींग नं. २, सं… कि…, उत्कर्ष नगर, मार्वे लिंक रोड, मिठ चौकी, मालाड (प.) मुंबई - ६४. गल्ली / सर्व्हे नं. Ward ……, घर / नाव नं. House/Name No. ……, फोन / मो. नं. Phone/Mo. No. ……, पॅन नं. PAN No. ……, रस्त्याचे नाव Road ……, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ……, गाव Village ……, पोस्ट Post ……, P Stn. ……

   तालुका Taluka ……, जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र. सध्याचा पत्ता Present Address वरील प्रमाणे.

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   श्री. महेश एन. साळुंकेपाटील, पद - उपनिबंधक, सहकारी संस्था, पी-विभाग, कांदिवली, मुंबई.

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

Scanned with CamScanner

यालील फिर्यादी श्री. एलीहा पॉल मृत्युंजय पंजा, वय-३५ वर्षे रा०ठि० फ्लॅट नं. सी/४११ ४था मजला, पद्‌मि. मालाड समिर को. ऑप. हौसिंग सोसा० लि०, समिर बिल्डींग नं. 2, उष्मा नगर, मार्वे लिंक रोड, मालाड (प), मुंबई-६४, यांच्या स्वतंत्र कागदावर टंकलिखित केलेला जबाब हाच प्रथम खबर अहवाल म्हणुन संबोधण्यात येत आहे.

समक्ष

Pawle
PI 19/03/21
(प्रविण पावले)
पोलीस निरीक्षक
ला०प्र०वि०, मुंबई विभाग.

ELIJAH PAUL M. PANJA
19/03/21.

फिर्याद दिनांक– १९/०३/२०२१.

मी एलीहा पॉल मृत्युंजय पंजा, वय ३५ वर्षे, धंदा– नोकरी (इंपेरियल ग्रॅन्ड पॅलेस हॉटेल पद–मॅनेजर ), रा. ठी. फ्लॅट नं. सी/४११, ४ था माळा, दि मालाड समिर को–ऑप हौ.सोसायटी लि, समिर बिल्डिंग नं. ०२, सी–विंग, उष्मा नगर, लिंक मार्वे रोड, मिठ चौकी, मालाड (पश्चिम) मुंबई–६४ मो.क्र. ९९३०००४२२०/ ९९३०१०४२२०.

———//———

मी वरील प्रमाणे असून फ्लॅट नं. सी/४११, ४ था माळा, दि मालाड समिर को–ऑप हौ. सोसायटी लि, समिर बिल्डिंग नं. ०२, सी–विंग, उष्मा नगर, मार्वे लिंक रोड, मिठ चौकी, मालाड (पश्चिम) मुंबई–६४ या पत्त्यावर राहत आहे. सध्या मी अंधेरी येथील इंपेरियल ग्रॅन्ड पॅलेस हॉटेल मध्ये मॅनेजर कम कॅप्टन म्हणुन नोकरीला असून त्यावर माझा व माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो.

मी रहात असलेला फ्लॅट नं सी/४११ हा माझी मानलेली आई श्रीमती सरोज जे. अय्यर हिने बक्षिसपत्र (GIFT DEED) करून माझे नावे ट्रान्सफर केला असून सदरचे बक्षीसपत्र सह दुय्यम निबंधक, बोरीवली–५ कार्यालयात दस्तऐवज नंबर बरल–५–११७७७–२०१९, दि. २०/०९/२०१९ अन्वये रितसर नोंदणीकृत करण्यात आले आहे.

मी व माझे आईने हयात असताना आम्ही रहात असलेला 'दि मालाड समिर को ऑ हौसिंग लि' या सोसायटीतील फ्लॅट नं सी/४११ चे मला मेंबर करण्याकरीता आणि नमूद फ्लॅटचे इलेक्ट्रीक बिल, मेन्टेंनन्स बिल, शेअर सर्टीफिकेट इत्यादी माझे नावावर ट्रान्सफर करण्याकरीता 'दि मालाड समिर को. ऑ. हौ. सोसा. लि' चे अध्यक्ष/सेक्रेटरी लेखी अर्ज दिला होता. परंतु सोसायटीने मला फ्लॅट नं सी/४११ चा मेंबर करून घेतले नाही. दरम्यानचे कालावधीत माझी आई श्रीमती सरोज जे अय्यर हिचे दिनांक १३/०७/२०२० रोजी निधन झाले.

मी, दिनांक २७/०७/२०२० रोजी उपनिबंधक कार्यालय, सहकारी संस्था, पी विभाग, ठाकुर कॉम्प्लेक्स, कांदिवली पूर्व, मुंबई–१०१ येथे 'दि मालाड समिर को. ऑ. हौ. सोसा. लि' या सोसायटीतील फ्लॅट नं सी/४११ चा सभासद करणे व सोसायटीचे शेअर सर्टीफिकेट नं. २० माझे नावावर ट्रान्सफर करण्याकरीता 'दि मालाड समिर को. ऑ.हौ. सोसा. लि' या सोसायटी चे विरूध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २२(२) नुसार वकिला मार्फत अपिल अर्ज क्रमांक २७/२०२० अन्वये अपिल दाखल केले. त्यानंतर उपनिबंधक कार्यालयात सोसायटीचे अध्यक्ष/सक्रेटरी आणि मी असे आमचे उपस्थितीत श्री महेश साळुंकेपाटील, उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे 'दि मालाड समिर को ऑ हौ सोसा. लि' या सोसायटीतील फ्लॅट नं. सी/४११ चे मला सभासद करण्याचे आदेश काढण्याबाबत निर्णय झाला व त्याबाबतचे आदेश १५ दिवसात मिळतील असे उपनिबंधक महेश साळुंकेपाटील यांनी मला सांगितले.

सभासद करण्याचे आदेश न मिळाल्यामुळे दिनांक ०५/०३/२०२१ रोजी मी पुन्हा सदर उपनिबंधक कार्यालयात जावुन तेथील कर्मचारी श्री चंद्रशेखर डोंगरवर यांना भेटलो असता त्यांनी माझी फाईल मिळाली असल्याचे सांगुन मला उप निबंधक श्री. महेश सांळुकेपाटील यांच्या कार्यालयात घेवून गेले व माझे सोसायटीच्या मेंबरशीपबाबत साहेबांशी चर्चा करून ते केबीनचे बाहेर आले. त्यानंतर केबीनमध्ये मी व उपनिबंधक श्री साळुंकेपाटील साहेब उपस्थित असताना साहेबांनी माझे फलॅटचा एरिया किती आहे, फ्लॅट कुठे आहे इत्यादीबाबत विचारणा करून त्यांच्या मोबाईलमध्ये काहीतरी आकडेवारी करून १,००,००० असे मला दाखविले. ते पाहून मी लगेच त्यांना विचारले की, 'दस हजार' त्यावर ते म्हणाले की, 'नही नही बराबर देखो'

Scanned with CamScanner

त्यानंतर मी सदरचे आकडे व्यवस्थित बघून म्हणालो की 'साहेब एक लाख है' त्यानंतर श्री. महेश साळुंकेपाटील म्हणाले की, 'हा इतना देना पडेगा'. एवढी मोठी रक्कम ऐकुन मी सुध्दा दचकलो. परंतु नाईलाजास्तव श्री साळुंकेपाटील साहेबांना 'ठिक है साहब' असे बोलुन सदर कार्यालयाच्या बाहेर आलो व माझ्या घरी आलो.

'दि मालाड समिर को ऑ हौ सोसा. लि' या सोसायटीतील फ्लॅट नं सी/४११ चे माझे सभासदत्वबाबतचे आदेश काढण्याकरीता लोकसेवक उपनिबंधक श्री महेश साळुंकेपाटील यांनी रू एक लाख (रू १,००,०००/–) लाचेची मागणी माझेकडे केली होती. परंतु मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे मी दि. ०८/०३/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे प्रत्यक्ष हजर राहुन पोलीस निरीक्षक प्रविण पावले यांच्याकडे तक्रार अर्ज दिला. त्यावेळी सहाय्यक पोलीस आयुक्त श्री कालेकर हे सुध्दा तेथे हजर होते.

त्यानंतर पो.नि. प्रविण पावले यांनी मला माझे तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दोन शासकीय पंचासमक्ष लाचेच्या मागणीसंदर्भात पडताळणी कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले. दोन शासकीय पंचांना समक्ष पडताळणीकरीता बोलाविण्यात आले. पडताळणीवेळी उपनिबंधक श्री साळुंकेपाटील साहेब व माझ्यात होणारे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे ध्वनिमुद्रित करण्यात येणार असल्याचेही सांगितले. त्यानंतर पोनि पावले, सपोआ कालेकर, दोन्ही पंच व पोलीस पथक असे आम्ही शासकीय वाहनाने उपनिबंधक, सहकारी संस्था, पी विभाग, कांदिवली पूर्व या कार्यालयापासुन थोडया अंतरावर जावुन थांबलो. पोनि पावले यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये माझे व पंच व स्वत:चे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. पडताळणीच्या अनुषंगाने आवश्यक सुचना दिल्यानंतर माझे शर्टच्या आतील बाजूस व्हॉईस रेकॉर्डर चालू करून लावला. मी व पंच श्री चौधरी असे लोकसेवक श्री महेश साळुंकेपाटील यांच्या उपनिबंधक, सहकारी संस्था, पी विभाग, कांदीवली पूर्व, मुंबई या कार्यालयात गेलो. त्यानंतर लोकसेवक श्री. महेश साळुंकेपाटील यांच्या केबीनमध्ये जावून प्रत्यक्ष भेटून माझे सोसायटीचे मेंबरशीप करण्याचे संदर्भात बोललो असता त्यांनी **'उस वक्त बोला था ना मैने आपको'** असे बोलले. म्हणुन मी, **'कुछ कम करो ना साहब'**, असे बोललो असता लोकसेवक **'नही..नही'** असे बोलले. त्यानंतर मी **'एक लाख बहुत हो रहा है...मेरा पास पैसा अॅडजस्ट नही हो रहा है' 'साहब कुछ तो कम किजीए ना एक का'** असे बोललो असता श्री साळुंकेपाटील यांनी दोन तीन पेपर जोडून असलेला कागद माझेकडे दिला व **'इस पर लिखो'** असे बोलून रक्कम लिहीण्यास सांगितली. म्हणुन मी माझे बॅगमधुन पेन काढुन त्यांनी दिलेल्या कागदावर इंग्रजी अक्षरामध्ये **"SIXTY THOUSAND RS : 60000"** असे लिहून त्यांना दाखविला असता ते **'नही'** असे बोलले. त्यानंतर पुन्हा श्री साळुंकेपाटील साहेब यांनी **1,00,000/–** असा आकडा त्याच कागदावर मला दाखविला असता मी त्यांना **'जी हा सर सिक्स्टी थाऊजंड ना'** असे बोलून मला नोकरी नसल्याबाबत साहेबांशी चर्चा करून मागणी केलेली रक्कम कमी करण्याची विनंती केली. त्यावेळी श्री साळुंकेपाटील साहेबांनी त्याच कागदावर इंग्रजीमध्ये **75000** असा आकडा लिहुन त्याला गोल (सर्कल) केले व **'ओके.. चल'** असे बोलून तडजोडीअंती रू. ७५,०००/– आणण्याचा इशारा केला व दिनांक १०/०३/२०२१ रोजी कार्यालयात येण्यास सांगितले. त्याबाबत मी पोनि पावले यांना माहिती दिली.

त्यानंतर दिनांक १०/०३/२०२१ रोजी मी पुन्हा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयात गेलो. पो.नि. पावले यांनी मला लोकसेवक यांनी मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमे विषयी विचारणा केली असता रुपये १५,०००/– माझेजवळ असून उर्वरीत रक्कमेची सोय झाली नसल्याचे सांगितले. पोनि पावले



Scanned with CamScanner

यांनी दोन शासकीय पंचांना सापळा कारवाईकरीता बोलावुन आम्हाला सापळा कारवाईची थोडक्यात माहिती व खबरदारीच्या सूचना दिल्या. त्यानंतर पोनि पावले, सपोआ कालेकर, दोन्ही पंच व पोलीस पथक असे आम्ही शासकीय वाहनाने उप निबंधक, सहकारी संस्था, पी विभाग, कांदिवली पूर्व या कार्यालयापासुन थोडया अंतरावर कोणालाही संशय येणार नाही अशा ठिकाणी जावुन थांबलो. पोनि पावले यांनी माझे शर्टच्या आतील बाजूस तोच व्हॉईस रेकॉर्डर लावून चालू केला. त्यानंतर मी व पंच श्री चौधरी असे उप निबंधक, सहकारी संस्था, पी विभाग, कांदीवली पूर्व, मुंबई या कार्यालयात गेलो. श्री. साळुंकेपाटील यांना समक्ष भेटुन माझे 'दि मालाड समिर को ऑ हौसिंग सोसायटी' चे मेंबरशीप बाबत चर्चा करून मागणी केलेली रक्कम सोबत आणल्याचे इशारा करून सांगितले असता लोकसेवक श्री महेश साळुंकेपाटील बोलले की, **'तुम इसका युज मत करो.. वो वैसे ही ढका रखो.. ओके' असे बोलून** लोकसेवकाने हाताचे बोट स्व:ताचे तोंडावर ठेवून पैश्यांचा तोंडाने उल्लेख करू नको असे मला इशारा करून सांगितले. त्यानंतर त्यांनी त्यांचे कार्यालयातील श्री चंद्रशेखर यांना बोलावुन माझे सोसायटीचे मेंबरशीप बाबतचे आदेश तयार करण्यास सांगितले. त्यानंतर मी काही वेळ त्यांचे केबीनचे बाहेर बसून पुन्हा श्री साळुंकेपाटील यांचे केबीनमध्ये जावून मेंबरशीप चे ऑर्डर बाबत चर्चा करून **'साहब वो, पैसा बोला था ना.. सेवन्टी फाय थाऊझन्ड लेके आया'** असे बोललो असता **'तुम उसका युझ मत करो...आर्डर करेगा ना आपका...'** असे लोकसेवक श्री महेश साळुंकेपाटील मला बोलले व त्यांनी पैश्यांचा तोंडाने उल्लेख करू नको असे हाताने पुन्हा इशारा करून मला सांगितले. साहेबांनी सांगितलेप्रमाणे श्री चंद्रशेखर यांनी माझेकडुन फ्लॅटसंबधीत कागदपत्रे व मयत आईची माहिती विचारून माझे मेंबरशीप करण्याबाबतचे आदेश तयार केले व लोकसेवक श्री महेश साळुंकेपाटील साहेबांना केबीनमध्ये नेऊन दाखविले. थोडयाच वेळात लोकसेवक श्री महेश साळुंकेपाटील हे त्यांची नेहमीच्या वापराची बॅग घेवून केबिनमधुन निघाले. मला ऑर्डर मिळाली नव्हती. म्हणून मी, चंद्रशेखर यांना साहेब जात आहेत का? असे विचारून यांच्या मागोमाग गेलो व त्यांच्या सोबत कंपाऊंडच्या मुख्यप्रवेशद्वारा समोर येवून उभा राहिलो. त्यानंतर श्री महेश साळुंकेपाटील साहेबांनी ओला कार बुक केली व कार येताच मला साहेबांनी **'बैठो'** असे बोलुन कारमध्ये बसण्याचा इशारा केला म्हणून मी **'बैठू साथ मे'** असे त्यांना बोललो असता त्यांनी **'हा.. वो बाजू मे बैठो'** असे बोलले. मी कारमध्ये बसलो व माझ्या बाजूला लोकसेवक श्री साळुंकेपाटील बसले. त्यानंतर आम्ही कारने काही अंतर पार केल्यानंतर तोंडाने न बोलण्याबाबत हाताने मला इशारा करून श्री साळुंकेपाटील यांनी त्यांच्याजवळील छोटीशी पॉकिट डायरी काढुन त्यावर हिंदीमध्ये **"आने वाले सिंग्नलपर उतर जावो"** असे लिहुन मला दाखवले. त्यानंतर पश्चिम द्रुतगती मार्गवर आरे कॉलनीला जाणारा रोड येताच लोकसेवक श्री सांळुकेपाटील यांनी मोटारकार चालकास सिग्नलजवळ गाडी थांबवण्यास सांगितले व मी सदर मोटारकारमधुन खाली उतरलो. ते त्याच मोटारकार मधुन आरे कॉलनी च्या दिशेने जात असताना मी त्यांचे गाडीचा मोबाईलने फोटो काढून कारचा नंबर पाहिला असता तो MH-01-CV-4208 असा होता. त्यानंतर मी पोनि पावले यांना संपर्क करून लोकसेवक श्री महेश सांळुकेपाटील यांनी लाचेची रक्कम स्विकारली नसल्याचे सांगुन घडलेल्या प्रकाराबावत संपूर्ण पथकाला माहिती दिली.

उप निबंधक, सहकारी संस्था, पी विभाग, कांदिवली मुंबई कार्यालयातील उप निबंधक श्री. महेश साळुंकेपाटील यांनी कायदेशीर परिश्रमाखेरीज स्वत:च्या फायदयाकरीता 'दि मालाड समिर को ऑप हौ सोसायटी लि.' या सोसायटीतील फ्लॅट नं सी/४११ चे मला मेंबरशीप करण्याबाबतचे आदेश काढण्याकरीता दिनांक ०५/०३/२०२१ रोजी माझेकडे रू. १,००,०००/- लाचेची मागणी केली. त्याप्रमाणे दिनांक ०८/०३/२०२१ रोजीच्या पंचांसमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान श्री. महेश साळुंकेपाटील यांनी माझे



Scanned with CamScanner

सोसायटीचा मेंबरशीप करण्याबाबतचे आदेश काढतो असे सांगुन माझेकडे तडजोडीअंती रू. ७५,०००/- लाचेची मागणी केली व लाचेची रक्कम दिनांक १०/०३/२०२१ रोजी घेऊन येण्यास सांगितले.

दिनांक १०/०३/२०२१ रोजी मी श्री महेश साळुंकेपाटील यांनी लाच म्हणून मागितलेली रक्कम घेवून त्यांच्याकडे गेलो व त्यांना रक्कम आणल्याचे सांगितले. मात्र मला त्यांनी ती माझेकडेच ठेवण्यास सांगून **'तुम इसका युज मत करो.. वो वैसे ही ढका रखो'** असे सांगितले. त्यानंतर त्याच दिवशी माझे मेंबरशीप करण्याबाबतचे आदेश तयार केले, परंतु मला दिले नाहीत. त्यानंतर लोकसेवक श्री महेश साळुंकेपाटील हे कार्यालयातुन बाहेर पडुन कारने जात असताना मला माझ्याकडील लाचेची रक्कम स्विकारण्याच्या उद्देशानेच कार मध्ये बाजुला बसण्यास सांगुन काही अंतर पार केल्यानंतर पुन्हा कारमधुन उतरण्यास सांगितले. म्हणुन माझी लोकसेवक श्री महेश साळुंकेपाटील, उप निबंधक, सहकारी संस्था, 'पी' विभाग, कांदिवली, मुंबई यांच्याविरूध्द माझी कायदेशीर कारवाई करण्याची विनंती आहे.

श्री. महेश साळुंकेपाटील, उप निबंधक, सहकारी संस्था, 'पी' विभाग, कांदिवली, मुंबई यांचेशी माझे कोणतेही पुर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देवाण-घेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझा जबाब मराठीत टंकलिखीत केला असून तो मला वाचून व हिंदीतून समजावून सांगितला. तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

Pawle

( प्रविण पावले ) 19/03/21

पोलीस निरीक्षक,

लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

ELIJAH PAUL M. PANJA

19/03/21.



Scanned with CamScanner

(7)

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ चौकशी अंती

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

—

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) —

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख वेळी व ठिकाणी आरोपी लोकसेवक श्री महेश साळुंके पाटील, पद- उपनिबंधक, सहकारी संस्था पी-विभाग कांदिवली मुंबई यांनी यातील फिर्यादी यांचे दि मालाड समिर को-ऑप-हौ-सोसा-लि-, या संस्थेतील फ्लॅट नं. सी/७११ चे सभासदत्व बाबतचे आदेश काढण्याकरीता कायदेशीर परिश्रमाखेरीज परितोषण म्हणुन १,००,०००/- रुपयांची मागणी करुन स्वत:साठी गैरलाभ मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणुन गुन्हा कलम-७, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि-१९८८ प्रमाणे गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पोलीस निरीक्षक प्रविण पावले

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

—

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ — ........, जिल्हा ........, राज्य ........

**Action taken** : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)........ Rank........ No........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to........ (3) Transferred to P. S. ........ District........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.) [signature]

[signature] PI 19/03/21

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name प्रविण वि. पावले.

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ला. प्र. वि., मुंबई.

Posting

Code No. of I. O. ........

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख 20/03/21.

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with CamScanner